# अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्यास २४ तासांत अटक

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणाऱ्या एकाला लोहमार्ग पोलिसांनी चोवीस तासांच्या आत अटक केली. पंकज रंगराव पाटील (वय २३, रा. रहाटणी) असे त्याचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, फिर्यादी यांचे मामा, त्यांचा मुलगा व पीडित मुलगी हे १६ ऑगस्ट रोजी उत्तर प्रदेशातील मूळ गावी रेल्वेने जात होते. सायंकाळी ५ वाजता ते पाटणा एक्स्प्रेस गाडीने जाण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशनच्या फलाट १ वर आले होते. ते सर्व जण बोगीमध्ये चढले. त्या वेळी पीडित मुलगी बाथरूमला जाते असे सांगून गाडीतून खाली उतरली. ती परत न आल्याने फिर्यादीचे मामा यांनी फिर्यादींना फोनवरून कळविले. त्यानंतर त्यांनी लोहमार्ग पोलिसांकडे १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची तक्रार दिली. पोलिसांनी ही तक्रार २१ ऑगस्टला दाखल करून घेतली. फिर्यादीकडे केलेल्या चौकशीत पंकज पाटील याचे नाव निष्पन्न झाले. त्यावरून पोलिसांनी तांत्रिक तपास करून त्याचा रहाटणी येथील घराचा शोध घेतला. २२ ऑगस्टला त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. तेव्हा त्याने पीडित मुलीला भोसरी येथे एका रूमवर ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर या मुलीला भोसरी येथून ताब्यात घेण्यात आले. पोलिस निरीक्षक मौला सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार सुनील कदम, आनंद कांबळे, फिरोज शेख, नीलेश बिडकर, स्वप्निल कुंजीर, महिला शिपाई सोनवणे यांनी हा तपास केला.

Scanned with CamScanner